## : प्रकरण २ रे :

# म. भा. भोसले - परिचय

## वाङ्मयीन कर्तृत्व, व्यक्तिमत्वाची जडणघडण, वाङ्मयीन प्रेरणा

मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रान्तात मल्हारी भाऊराव भोसले यांचे स्थान अनन्य साधारण आहे. जन्मताच प्रतिकूल परिस्थिती आणि पुरेशी साधने लाभतात ती माणसे अल्पावधीतच कीर्ती मिळवून प्रगतीच्या अत्युंच्च शिखरावर पोहचतात. पण काही दुबळी माणसे असतात त्यांना नशीब साथ देत नाही. योग्य ती परिस्थिती लाभत नाही पण तरीही प्रयत्नाच्या आणि आत्मविश्वासाच्या बळावर ती काहीतरी करुन दाखवतात, काहीतरी घडवतात. अशा व्यक्तीत म. भा. भोसले यांचा समावेश करण्यात हरकत नाही.

**✳ परिचय :-**

ग्रामीण जीवनावर नितांत प्रेम करून निष्ठापूर्वक तो परिसर आपल्या वाङ्मयातून जिव्हाळ्याने चित्रित करणारे म. भा. भोसले एक ग्रामीण वाङ्मय लेखक आहेत. त्यांचा जन्म १५ जुलै १९१४ रोजी सांगली जिल्ह्यातील भिलवडी नजीक औदुंबर या पवित्र तीर्थक्षेत्राजवळ कृष्णेच्या काटावर असणाऱ्या धनगांव या गावी झाला. घरची अत्यंत गरीबी, तरीही तीव्र इच्छाशक्ती, प्रगाढ आत्मविश्वास या जोरावर त्यांनी सातवी पर्यंतचे शिक्षण घेतले. त्यावेळी १९३० साली सातारा सेंटरला ते सातवीच्या परीक्षेत पहिल्या क्रमांकाने पास झाले. इंग्रजी शिकून काहीतरी करावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती पण अशिक्षित कुटुंबात जन्म घेतल्याने त्यांची कुचंबणा झाली. स्वत: प्रचंड हालअपेष्टा सोसून, कष्ठ करून आई वडिलांनी त्यांना सारे काही पुरविले पण परिस्थितीच्या चक्रात ते सापडले व शेती करू लागले.

त्याच बरोबर पोलीस खात्यात जाऊन आपण फौजदार व्हावे अशीही त्यांची इच्छा होती. पण १९३२ साली त्यांच्या जीवनाला अनपेक्षितपणे कलाटणी मिळाली. त्यावेळी शिकण्याची इच्छा असूनही बोर्डिंगमध्ये राहणे व फी भरणे अशक्य असल्याने त्यांना शिक्षणाचा नाद सोडावा लागला पण त्यावेळी सातवीचे काही नंबर ट्रेनिंगसाठी घेत असल्याने त्यांना तसा हुकूम आला व ट्रेनिंगसाठी जुन्नरजवळ

नारायणगावला ते एक वर्ष राहिले. नंतर स्वत:च्या गावापासून जवळ असलेल्या भिलवडीत त्यांची प्राथमिक शिक्षक म्हणून नेमणूक झाली.

**✳ वाङ्मयीन कर्तृत्व :-**

म. भा. भोसले यांचे वाङ्मयीन कर्तृत्व फार मोठे आहे.ग्रामीण साहित्यात त्यांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. कथा, कादंबरी, नाटक या क्षेत्रात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला. १९३६ साली 'आजोबाची डायरी' ही त्यांची पहिली कथा मुंबईच्या 'निर्भीड' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. इथूनच त्यांच्या कथा लेखनाला सुरुवात झाली. १९३२ ते १९४२ या काळात त्यांनी जे लिहिले, अनुभवले, त्यांना जे जाणवले तेच 'समरांगण' या कादंबरीत रेखाटले. या कादंबरीतून सावकाराची गांजवणूक मुकाट्याने सहन करणारा शेतकरी व त्या सावकाराच्या दुष्कृत्याला प्रतिकार करणारा त्यांचा मुलगा भगवान याचे चित्रण येते.

'समरांगण' कादंबरीतून झगडणाऱ्या व्यक्तीचे जीवन रंगविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल साथी एस् . एम् . जोशी यांनी या कादंबरीवर परीक्षण लिहून भोसले यांचे अभिनंदन केले.त्यानंतर 'दै.केसरी', 'नयन', 'मन्वतंर', 'मराठा', 'मनोहर' यातूनही या कादंबरीवर परीक्षणे लिहिली गेली. ग्वाल्हेर दरबारातून या कादंबरीला शंभर रूपयाचे बक्षिस ही मिळाले.

यानंतर भोसले यांच्या कादंबरीतून व्यापक अशा समाजदृष्टीची जाणीव झाली. 'उघड्या जगात' या कादंबरीतून चौफेर विचारांची गुंफण आढळते. मुळात ग्रामीण जीवनातील पिढ्यानपिढ्या असणाऱ्या वैर, रंगेलपणा यांची चित्रणे रंगविण्यात ते सरस ठरले. त्यांच्या बाबतीत जाणीवपूर्वक प्रसंगांची केलेली गुंफण महत्त्वपूर्ण ठरते. दैनंदिन ग्रामजीवनातील कल्पनांचाही ते वापर करतात. कृषिकेंद्रित वास्तवतेला ते प्राधान्य देतात. समाजातल्या सर्व घटकांपर्यंत त्यांच्या या कादंबरीचे स्वागत झाले. सुरूवातीला काही बाबतीत या कादंबरीबाबत वाईट अनुभवही आले. सुरुवातीच्या 'समरांगण' कादंबरीला यश मिळूनही 'उघड्या जगात' कादंबरीचे हस्तलिखित त्यांच्याकडे पाच वर्षे पडून होते. पण तिला प्रकाशक मिळाला नाही. तेव्हा ते म्हणतात, ''मराठीतल्या नामांकित चारपाच प्रकाशकांना मी ती दाखविली

पण चांगल्या कथेचे मर्म जाणण्याची अक्कल एकालाही नव्हती.''[१] पुढे १९४७ साली ती प्रकाशित झाली. 'ग्रामीण प्रकाशन, धनगांव' (भिलवडी) या नावाने प्रकाशन संस्था स्थापन करून त्यांनी ती प्रकाशित केली. वामनराव कुलकर्णी यांच्या 'मंगल पिक्चर्स' ने तिची चित्रपटासाठी निवड करून 'जिवाचा सखा' हा चित्रपट तयार केला. त्यालाही बऱ्याच प्रमाणात यश मिळाले.

शांता शेळके यांनी या कादंबरीवर अभिप्राय लिहिला व त्यातून या कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे वास्तव व सुंदर चित्रण रेखाटल्याबद्दल भोसले यांचे कौतुक केले.

१९४५ च्या दरम्यान भोसले यांच्या काही कथा 'किर्लोस्कर', 'मनोहर' मासिकातून प्रकाशित झाल्या. त्यात 'खिल्लारी जोडी' ही महत्त्वपूर्ण कथा आहे. पुढे 'दै. मन्वंतर' यावृत्तपत्रातून त्यांच्या कथा प्रकाशित होत गेल्या व त्यांच्या वाङ्मयीन स्थितीत बदल होत गेला. ग्रामीण जीवनासंबंधीच्या त्यांच्या कक्षा रूंदावल्या 'मन्वंतर'नेच त्यांना प्रसिद्धीच्या मार्गावर नेऊन सोडले.

म. भा. भोसले यांचा 'गार सावली' हा पहिला कथा संग्रह १९४८ साली प्रकाशित झाला. पुण्यातील ट्रेनिंग कॉलेज मध्ये एक वर्ष असताना प्राचार्य पानवलकर यांचे अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध ग्रामीण वाङ्मय लेखक ग. ल. ठोकळ यांचे हस्ते 'गार सावली' चे प्रकाशन झाले.

या कथासंग्रहात पूर्व प्रसिद्धी मिळालेल्या सर्व कथा समाविष्ट करण्यात आल्या. तेव्हा त्यातील 'खिल्लारी जोडी' 'सखा गालात हसला', 'भागीदारीण' या कथांनी ग्रामीण कथेतले आपले स्थान दाखवून दिले. खेड्यात शेतात राबणारी, शेतकऱ्याला जीव की प्राण असणारी बैल जोडी सुचलेल्या दुर्बुद्धीमुळे विकली जाते तेव्हा नंतर त्यांचे दुःख सहन न होणारे असते. 'भागीदारीण' कथेत पुरूषाच्या बरोबरीने काम करणारी धाडसी तरूणी त्याच्या संसारात भागीदारीण बनून येते याचे चित्रण येते.

भोसले यांचा 'नांदाय जाते' हा दुसरा कथासंग्रह १९४९ साली प्रकाशित झाला. मानवी जीवनाचे सूक्ष्म चित्रण घडविणे हा उद्देश या कथासंग्रहामागील कथेपाठिमागे दिसतो. 'ज्ञानप्रकाश', 'मनोहर', 'विविधवृत्त', 'चिकित्सक', 'नवयुग' मासिकातून तर 'दै मन्वंतर', 'दै. प्रकाश' या

वृत्तपत्रातून या कथासंग्रहावर समीक्षणे लिहिली गेली. वास्तववादी ग्रामीण जीवनाचे आदर्श चित्रण 'नांदाय जाते' कथेतून चित्रित झाले. वाचकांनी या कथासंग्रहातील कथांचे प्रचंड स्वागत केले.

ग्रामीण भागात वावरणारी माणसे, त्यांची जीवनपद्धती, त्यांची विविध रूपे, त्यांचे मन या गोष्टी कथेतून चित्रित करण्याची भोसले यांची हौस दांडगी आहे. ग्रामजीवनात वावरणारा माणूस, त्यांची सुखदु:खे याला ते सामोरे जातात. लेखकाचे स्वत:चे मन त्या माणसांच्या भोवती वावरते. म्हणूनच प्रत्यक्षात पाहिलेले ग्रामीण जीवन कथेतून ते साकार करतात.

भोसले यांचे वाङ्मयीन कर्तृत्व जाणून घेत असताना 'एका आईची लेकरं' या कुटुंबवत्सल कादंबरीकडे पाहावे लागते. १९५० साली ती प्रकाशित झाली. एका अविनाशी अमर भावनेने ग्रामीण कुटुंबातील जिव्हाळ्याचे दर्शन यातून त्यांनी घडविले. ठसठशीत व्यक्तिदर्शन व मनोविश्लेषणाला त्यांनी प्राधान्य दिले. या कादंबरीतील गोजावक्का हे पात्र कादंबरीचा गाभा असून ती शेवटपर्यंत कथानकाला रूंजी घालते. एका कुटुंबाचे वर्तुळ एखाद्या चित्रपटातील प्रसंगाप्रमाणे समोर येते.

एकाच आईच्या पोटी जन्मलेल्या, एकमेकावर उत्कट-प्रेम करणाऱ्या व रागाच्या भरात एकमेकापासून दूर झालेल्या व आतड्याच्या मायेने पुन्हा एकत्रित आलेल्या दोन भावांची ही कथा आहे. या कादंबरीतून खेड्यातील एकत्र कुटुंब पद्धतीचे हुबेहुब चित्रण समोर येते.

या कादंबरीवर 'दै प्रकाश' मध्ये ४ फब्रुवारी १९५१ रोजी के. ना. कुलकर्णी यांनी परीक्षण लिहून ''ग्रामीण व नागर भाषेचा सुंदर समन्वय भोसले यांनी या कादंबरीत घातला आहे.''[२] असे म्हटले आहे. त्यानंतर 'दै मन्वंतर', 'दै. लोकसत्ता', साप्ताहिक 'मौज', 'चिकित्सक', 'मनोहर', 'विविधवृत्त' यातून या कादंबरी परीक्षणे लिहिली गेली.

त्याच बरोबर १९६० साली मुंबई आकाशवाणीने 'तीन उत्कृष्ठ कादंबऱ्यांची निवड केली. त्यामध्ये म.भा. भोसले यांच्या या कादंबरीचा उल्लेख केला गेला आहे. ग. ज. माळिंबे यांचे बिवलकरांची 'शुभा', म. भा. भोसले यांची 'एका आईची लेकरं' व शांता शेळके यांची 'मायेचा पाझर' या कादंबऱ्यावर भाषण झाले. त्यामध्ये भोसले यांच्या कादंबरीबद्दल त्यानी गौरवपूर्ण उद्गार काढले.

त्याचबरोबर प्रा. म. ना. अदवंत यानी ८ जून १९६१रोजी ८.३० वाजता मुंबई आकाशवाणीवरुन या कादंबरीचे परीक्षण केले.

भोसले यांनी उत्सुकता वाढविणारे प्रसंग कथा लेखनात कसोटीने राबविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांच्या कथेच्या यशस्वीतेला ते वातावरण पूरक ठरले. 'अहेव लेणं ' हा त्यांचा कथासंग्रह १९५१ साली प्रकाशित झाला.

ग्रामीण परिसरातच जन्म झाल्याने व वास्तव्य ही ग्रामीण भागातच असल्याने तेथील जनता, शेतकरी, मजूर, कामकरी यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले, त्यांच्या सुखदु:खाशी ते एकरूप झाले. स्वत:च्या हक्काशी एकरूप राहणारा कुणबी त्यांना जवळचा वाटला. त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्यांना झाली व त्याच्या विषयी मनात तळमळ निर्माण झाली व त्यातूनच कथालेखनाचा उदय झाला.

'अहेव लेणं' या कथासंग्रहात ग्रामीण जीवनाचे निष्ठेने व जिव्हाळ्याने चित्रण केले. सफाईदार निवेदन ही काही कथातून त्यांनी केले. या कथा संग्रहावर 'चिकित्सक', 'मौज', 'दै. लोकसत्ता' (दि. २३-३-१९५२) यातून परीक्षणे लिहिली गेली.

ग्रामीण जीवनाला जवळचे असणारे विषय या कथासंग्रहातून हाताळले असल्याने भोसले यांची भाषा काळ्या जमीनीप्रमाणे सकस, पिळदार व सामान्य लोकांना समजेल अशी ठरली आहे. अलंकार, शब्दांचा डामडौल ते आपल्या भाषेवर कधीच चढवत नाहीत. हिंदू मुस्लीम ऐक्य 'नवी पिढी' या कथेतून तर 'गोकीचे गोकुळ' या कथेमधून मानवी स्वभावाचे विश्लेषण ते करतात. त्यामुळे या कथासंग्रहातील कथांना त्यांच्या पूर्वीच्या कथापेक्षा वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे.

'पाहुणेर' हा भोसले यांचा कथासंग्रह 'अहेव लेणं' या कथासंग्रहानंतर चार वर्षांनी १९५५ साली प्रसिद्ध झाला. यातून निरनिराळ्या विषयावर प्रकाश टाकणाऱ्या कथा चित्रित झाल्या. वास्तवता हा भोसले यांच्या कथेचा आत्मा असल्याने जीवनातील हरघडी घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांवर त्यांची आधारलेली कथा जीवनानुभवाला प्राधान्य देते. खेड्यातील समाजाची सुखदु:खे, भावभावना या

अनुभूतीतूनच त्यांची कथाचित्रे निर्माण झाली. म्हणून ती जिवंत व जातीवंत वाटतात.

'महापूर' या कथेत असणारे वैर, भांडणे, मारामाऱ्या, उच्चनीच भाव महापूरसारखे सार्वजनिक संकट आल्यानंतर निघून जातात. या कथासंग्रहातील त्यांच्या प्रेमकथा म्हणजे कृष्णाकाठच्या मळीतील मक्याचा हुरडाच आहे. खेड्यातील रगेल व रंगेल नायक निरागस मनोवृत्तीचे आहेत. त्यांच्याजवळ उत्तानपणा नाही, जवानीची मस्ती आहे पण तरलताही आहे. एकंदरीत साधी सोपी सुटसुटीत भाषा त्यांनी वापरली आहे.

'चेतना (मुंबई). 'संगम' (कऱ्हाड), 'मनोहर' (किलोस्करवाडी) या मासिकातून या कथासंग्रहावर लिहिले गेले.

म. भा. भोसले यांच्या कथेचा बारकाईने अभ्यास केल्यास त्यांच्या लेखनाचे बारकावे लक्षात येतात. भोसले हे उत्सुकता वाढविणारे कसब कथा लेखनात कसोटीने राबविण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या कथेच्या यशस्वीतेला ते पूर्णपणे पूरक ठरले आहे. भाषाशैली, संवाद, रचना याबाबतही त्यांनी बऱ्याच प्रमाणात प्रगती केली आहे.

१९६० साली त्यांचा 'पाझर' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आणि त्याला चांगले यशही मिळाले. ग्रामीण जीवनातील विविध पैलू त्यांनी या कथासंग्रहातील कथातून दाखवून दिले. 'बकुळा' सारख्या कथेतून स्त्रीसुलभ भाषेचा आविष्कार दाखवून दिला आहे. तर काही कथातून मानवी भावनांचे उत्कृष्ट आविष्करण केले आहे. त्यांच्या संपूर्ण कथालेखनाला वास्तवाची साथ असल्याने ते चित्रण काळजाला हात घालणारे ठरते. या कथासंग्रहातील कथेतून त्यांनी लयबद्ध भाषाशैली वापरली आहे. मानवी सुखदु:ख हे समाजात व्यापून राहिले आहे याची भोसले यांना जाणीव आहे. व त्याचा प्रत्यय त्यांच्या कथेतून येतो.

त्यांच्या निवडक ग्रामीण कथांचा संग्रह १९६३ साली प्रसिद्ध झाला. 'गार सावली', 'नांदाय जाते' व 'पाहुणेर' या कथा संग्रहातील निवडक कथा 'ग्रामीण कथा' या नावाने प्रसिद्ध झाल्या. मानवी भावनांचे विविधरूपी दर्शन त्यातून घडले. प्रेमाचा त्रिकोण, पराक्रमाची प्रेरणा देणारी स्त्री,

अस्पृश्यता, हाडवैर, मानवतेची हाक, मुक्या प्राण्यावरील प्रेम इ. गोष्टीना प्राधान्य देऊन त्यांनी कथा निवडल्या व त्याना वाचकापर्यंत पोहचवले.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण जीवनाला एक विशिष्ट रूप प्राप्त झाले. त्याच्या कक्षा रूंदावल्या. साक्षरता, सहकार चळवळ, आरोग्य केंद्रे, शाळा इ. गोष्टींना प्राधान्य दिले गेले. त्यामुळे समाजाचे विशिष्ठ असे रूप साकार झाले. कथेच्या बाबतीत ही वास्तवाला सामोरे जाणारी व वाङ्मयीन गुण दाखवून देणारी कथा निर्माण होऊ लागली. भोसले यांनी ही अपेक्षा पूरी करण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण पार्श्वभूमीवर भोसले यांनी माणसांनी सुखदुःखे, त्यांच्या समस्या, घटनाप्रधान असे त्यांचे जीवन या बाबतीत त्यांची कथा पुढे सरकत गेली.

'कथा जन्माची कथा' हा भोसले यांनी असा एक कथा संग्रह प्रसिद्ध केला की त्यातून जन्माला येणाऱ्या कथेसंबंधीची कथा सांगितली. 'आजोबाची डायरी', 'खिल्लारी जोडी', 'अहेव लेणं' या कथांचा जन्म व्हायला कारण काय? यासंबंधी त्यांनी विवेचन केले. एकूण पाच कथांचा हा संग्रह वाचल्यानंतर वाङ्मय निर्मिती संबंधी तो बरेच काही सांगून जातो. लेखकाच्या साहित्य निर्मिती बाबत असणाऱ्या कक्षा किती रूंदावलेल्या असतात याची साक्ष या कथांची पार्श्वभूमी वाचताना पटते. जीवनाची व्यापक जाणीव भोसले यांना किती तीव्र स्वरूपाची होती हे समजून येते.

या कथासंग्रहाच्या बाबतीत भोसले यांनी आपल्या कथा लेखनामागच्या प्रेरणा सांगितल्या. लेखनासाठी आईवडिलांच्या संस्काराची जाणीवही करून दिली. प्रचंड स्वरुपात वाचन, आजूबाजूच्या जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके यांच्या लेखन तंत्राचा प्रभाव त्यांच्या कथेवर पडलेला दिसतो. तेव्हा भोसले यांनी लेखनाचे विषय आपण कुठून उचलले, प्रत्यक्ष जीवनाशी त्याचा काय संबंध आला व पुढे कथा कशा साकार झाल्या हे कथांच्या बाबतीत त्यांनी सांगितले.

भोसले यांच्या वाङ्मयाची ओळख करून घेत असताना त्यांच्या 'घसरगुंडी' या कादंबरीकडे लक्ष दिले जाते. १९६३ साली ती प्रसिद्ध झाली. खेड्यातील माणसाचा साधा, सरळ स्वभाव, त्याची मनमोकळी वागणूक, कष्ठ करण्याची तयारी इ. कौटुंबिक बाबी चित्रित केल्या. आयुष्याच्या

चढणीवर अनेकदा घसरगुंडीचा प्रसंग येतो हे सांगण्यासाठी एका विद्यार्थ्यांच्या जीवनाचे चित्रण त्यांनी या कादंबरीतून केले. त्या होतकरू विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी निरपेक्षपणे धडपडणाऱ्या अकबर मास्तराची व्यक्तिरेखा या कादंबरीत महत्त्वपूर्ण ठरते.

प्रचलित परिस्थितीवर लिहिलेली ही सामाजिक कादंबरी आयुष्याच्या चढणीवरील प्रसंगातून बऱ्याच गोष्टींचा शोध घेते. 'सकाळ', 'केसरी', या वृत्तपत्रातून या कादंबरीवर परीक्षणे लिहिली गेली.

म. भा. भोसले ग्रामीण भागात जन्मले असल्याने त्याच्याशी त्यांचे नाते जवळचे आहे. ग्रामीण विकासाच्या ज्वलंत प्रश्नावर स्वतंत्र अशी सामाजिक कादंबरी त्यांनी लिहिली. एका स्वतंत्र खेड्याचा कायापालट त्यांनी 'कायापालट' कादंबरीतून करून दाखविला. गावात येणारा एक मास्तर साऱ्या गावात बदल घडवून आणतो. खेडूत जनतेस जागृतीचा मार्ग दाखवितो. गावाच्या विकासासाठी सरकारने जी मदत केली त्याचा उपयोग करून त्या खेड्याचा 'कायापालट' करतो.

खेड्यातल्या वास्तव जीवनाला ते या कादंबरीच्या बाबतीत सामोरे गेलेले दिसतात. एका कर्तव्यतत्पर शिक्षकाची आत्मकहाणी म्हणूनही तिच्याकडे पाहिले जाते. कुणीतरी विरोधाची भूमिका घेणारा गावकरी व मास्तराचे मनोगत ओळखून सर्व योजनात सहभागी होणारी मुले लेखकाने सजीव स्वरूपात चित्रित केली आहेत. या कादंबरीतील कुत्र्याचा प्रामाणिकपणा व त्याचा मृत्यू हे प्रसंग हेलावून सोडणारे आहेत.

१५ ऑगस्ट १९६६ साली ही कादंबरी प्रसिद्ध झाली. 'केसरी', 'लोकसेवक', 'विशाल', 'सह्याद्रि' या वृत्तपत्रातून तसेच 'लोकराज्य', 'विजय' या मासिकातून परीक्षणे लिहिली गेली.

ग्रामीण समाज व भोसले यांचे नाते जवळचे आहे. त्यांनी जी सामाजिक परिस्थिती पाहिली, अनुभवली तीच वास्तव स्वरूपात मांडली. समाजजीवनाचे त्यांनी केलेले चित्रण त्यांच्या चिंतनाचा एक प्रमुख भाग आहे. ग्रामीण समाजजीवन उभे करणे हा त्यांचा हेतू होता.

म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनाचा वेध नाटकामधूनही घेतला आहे. एका संयुक्त

कुटुंबातील परिस्थितीचे आकलन न झाल्यामुळे कुटुंबातील आर्थिक प्रश्न व वैयक्तिक स्वातंत्र्य या दोन कारणाने विभक्त झालेल्या दोन भावांची ही कथा आहे. जीवनात पुढे येणाऱ्या कटु अनुभवानी हे 'रक्ताचं नातं' पुन्हा जोडलं जातं.

रक्ताचं नातं कधीही तुटत नाही या मध्यवर्ती कल्पनेला समोर धरुन भोसले यांनी कथानकाची गुंफण केली आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग १० ऑगस्ट १९५१ रोजी कोल्हापूरात झाला. नंतर महाराष्ट्रभर त्याचे अनेक प्रयोग झाले. ग्रामीण जीवनातील वास्तवाचे चित्रण भोसले यांनी उत्कटतेने उभे केले आहे. आपल्या कर्तव्याशी कठोर, अंगी असणारी सात्विक वृत्ती, उदार हृदय व निस्सीम प्रेम या नाटकातल्या पात्रांची ही वैशिष्ट्ये आहेत. या नाटकात कवी सुधांशु यांची भावमधुर अर्थपूर्ण भावगीते घातली आहेत. त्यामुळे या नाटकाला एक वैशिष्ट्यपूर्ण स्वरुप प्राप्त झाले आहे.

'दै. लोकसत्ता', 'दै. प्रकाश', 'धुर्नुधारी', 'मन्वंतर' इ. मधून या नाटकावर परीक्षणे लिहिली गेली आहेत.

भोसले यांनी ग्रामीण जीवनातील, खेड्यात हरघडी घडणाऱ्या प्रसंगावर 'पतीचा खून' हे नाटक लिहिले. या नाटकात प्रसंगनिर्मितीला त्यांनी जास्त प्राधान्य दिले आहे. ग्रामीण परिसरातील एका प्रसंगाला त्यांनी समाजासमोर आणले आहे.

ग्रामीण वास्तवतेचा नमुना म्हणून 'लाडकी लेक' या त्यांच्या नाटकाकडेही पहावे लागते. खेड्यातल्या माणसाच्या ठिकाणी असलेल्या भावनेला त्यांनी वाव दिला व या नाटकातून सरस असे चित्रण घडविले.

म. भा. भोसले यांनी बऱ्याच प्रमाणात बाल वाङ्मय ही लिहिले आहे. 'नाट्यसप्तक', 'जातीला जागा नाही', 'भिकारी राजपुत्र' या पुस्तकातून लहान मुलांसाठी बरेच काही सांगितले आहे. 'चिमणचारा' या पुस्तकातून मुलांच्या अंतकरणाला झेपतील अशा भाषेत विचार मांडले आहेत. हे ललित निबंध विशिष्ट परिस्थितीला सामोरे जाऊन लिहिले आहेत. 'नाट्यसप्तका'तून लहान मुलांच्यासाठी सात विनोदी नाट्य प्रवेश दिले आहेत. तर 'भिकारी राजपुत्र' मधून मुलांना आवडेल अशी एक कथा आहे.

'जातीला जागा नाही' ही एक शालेय संगीत विनोदी नाटिका आहे. ग्रामीण भागात या नाटिकेचे बरेच प्रयोग झाले आहेत. संवाद अत्यंत सुटसुटीत व सुबोध भाषा यामुळे ही नाटिका आकर्षक ठरली आहे.

'नापास नगरी', ' न यायच्या वाटेवर' इ. बालनाटिकाही त्यांनी लिहिल्या आहेत.

समाजशिक्षणाच्या भूमिकेतून भोसले यांनी 'आमची वाडी', 'काळीचा कोप', 'हातचा घास', 'गुणवंताची लेक' इ. लहान पुस्तके लिहिली आहेत.

'आधुनिक वाङ्मय प्रकार' हे त्यांचे पुस्तक वेगवेगळ्या वाङ्मय प्रकाराविषयी त्यांनी केलेले विवेचन आहे. या पुस्तकाच्या दोन विभागात गद्य व पद्य यांचा इतिहास दिला आहे. यातून लेखकाची डौलदार भाषाशैली दिसून येते. भोसले यांच्या या पुस्तकाला ग्वाल्हेर दरबारातून १०० रू चे पारितोषिक मिळाले आहे. 'दै. लोकसेवक' मध्ये ७ जुलै १९४७ रोजी या पुस्तकावर परीक्षण लिहून त्यांची सविस्तर माहिती दिली आहे. 'सकाळ', 'मन्वतंर' यांनीही या पुस्तकाविषयी योग्य ती माहिती दिली आहे.

भोसले यांचे वाङ्मय असे विविधांगी स्वरुपाचे आहे. ग्रामीण जीवनाचे निष्ठेने व जिव्हाळ्याने चित्रण त्यांनी घडविले असल्याने त्यांच्या लेखनाला एक विशिष्ट जाणीव प्राप्त झाली आहे. महाराष्ट्रात त्यावेळी गाजत असलेल्या व आपला स्वत:चा प्रभाव वाचकांच्यावर असणाऱ्या वृत्तपत्रे व मासिकातून त्यांच्या कथा व कादंबऱ्यावर लिहिले गेले आहे.

**✳ व्यक्तिमत्वाची जडणघडण :-**

म. भा. भोसले हे ग्रामीण भागाचे अतिशय तळमळीने लेखन करणारे एक लेखक आहेत. ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक, चित्रपट, बालवाङ्मय या क्षेत्रात त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवला आहे. भोसले यांना ग्रामीण भागात वावरताना, लेखन करताना सामाजिक जीवनाची जाणीव आहे. खेड्यात वावरणाऱ्या अशिक्षित माणसाच्या अंत:करणापर्यंत ते पोहचले आहेत. उपेक्षितांच्या दु:खाची त्यांच्या मनात तळमळ आहे. त्यांच्यावर लादल्या गेलेल्या अस्पृश्यतेबाबत त्यांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहतात. त्यांना असणारा स्वत:चा हक्क मिळावा म्हणून ते काही उपाय ही सुचवतात.

सावकाराचाच मुलगा सावकाराविरूद्ध लढतो व लोकांना हक्क मिळवून देतो हे त्यांनी रंगविलेले चित्रण एखाद्या मोठ्या खेड्यात त्यांनी पाहिले आहे. व त्याला वाव देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

भोसले हे धनगांव सारख्या कृष्णेच्या काठावर असणाऱ्या खेड्यात जन्मले. लहानपणी घरची अत्यंत गरीबी असल्याने व शिक्षण घेण्याविषयी जिद्द असल्याने त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाला प्रथमच चालना मिळत गेली. सुरूवातीला काही दिवस आपण कुणीतरी लेखक होऊ हे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. पोलिस खात्यात जावून समाजासाठी काहीतरी करावे असे त्यांना वाटे पण जीवनाला अनपेक्षितपणे मिळालेल्या वळणामुळे ते शिक्षणाकडे वळले गेले.

त्यांच्या घरात सुशिक्षित कुणीच नसल्याने कथा, कादंबऱ्या किंवा मासिकांचे त्यांना कधीच दर्शन झाले नाही. सहावीत असताना त्यांना कृ. बा. बाबर हे हेडमास्तर म्हणून लाभले आणि ते स्वत: लेखक असल्याने भाषा-निबंध उत्तम शिकवीत. तसेच त्यांनी बालवाङ्मयाची काही पुस्तके शाळेत आणल्याने ती भोसले यांच्या वाचनात आली. त्याचा परिणाम शाळेत उत्तम निबंध लिहिण्याबाबत त्यांना झाला व बक्षिसेही मिळाली. नंतर त्यांनी सातवी पर्यंत शिक्षण घेतले. सातारा सेंटरला ते पहिल्या क्रमांकाने पास झाले व त्यांना ट्रेनिंगचा हुकूम आला व ते संपवून ते लहान वयातच मास्तर झाले. तोपर्यंत त्यांना मराठीतल्या लेखकासंबंधी व वाङ्मयासंबंधी काहीही माहिती नव्हती.

पण योगायोगाने एका दिवाळीत सांगलीच्या बुकसेलरकडे त्यांना 'हिंदोळ्यावर'हे विभावरी शिरूरकरांचे पुस्तक मिळाले आणि त्याच्या वाचनाने चमत्कार घडावा त्याप्रमाणे ते 'किर्लोस्कर' चे वर्गणीदार तर झालेच पण फडके, खांडेकर हे लेखक त्यांना परिचित झाले.

भोसले यांच्या व्यक्तिमत्वाला पूरक असे वातावरण सुरुवातीला त्यांच्या घरातच निर्माण झाले. त्यांचे आईवडील अडाणी असले तरी त्यांचे मन फार मोठे होते. त्यांची सद्भावना तर आदर्श होतीच पण संस्कृती उच्च होती. स्वत: कष्ट सोसून इतराना मदत करण्यात त्यांनी आपला बराच वेळ खर्ची घातला होता. साहजिकच भोसले यांना तो वारसा मिळाला व त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाला. त्याच जोडीला वाचन आणि आजूबाजूच्या जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण यातून हे वातावरण लेखन करायला साहाय्यभूत ठरले.

कवी किंवा लेखक कसा बनतो याविषयी त्यांची समजूत त्यावेळी एका अर्थाने ठरून गेली होती. ते म्हणतात, ''स्वत:पेक्षा दुसऱ्याचा विचार अधिक करणारा, दुसऱ्याच्या दु:खानं तळमळणारा, हळहळणारा व दुसऱ्याच्या आनंदानं बेहोष होणारा आत्मा ज्याला लाभला आहे तसा कुणीही मनुष्य, जर तो अक्षरशत्रू नसेल तर कवी किंवा लेखक बनला पाहिजे !''[३] या प्रक्रियेतूनच त्यांचे सारे लेखन झाले आहे.

भोसले यांच्या व्यक्तिमत्वाला असे विविधांगी स्वरुप प्राप्त होत असताना त्यांचे जीवन मात्र खेड्यात जात होते. ग्रामीण परिसराचे आणि त्यांचे जवळचे नाते आहे. ते ज्या बहुजन समाजात वावरतात त्या समाजाचे जिवंत चित्रण अवलोकन शक्तीच्या जोरावर कथेतून करतात. त्या समाजाशी ते पूर्णपणे एकरूप झालेले असतात.

भोसले हे एक प्राथमिक शिक्षक असल्याने ग्रामीण भागातल्या प्राथमिक शिक्षणाविषयी त्यांना आस्था आहे. स्वत:चे कष्टात शिक्षण झाल्यामुळे त्यांना इतरांच्या शिक्षणाविषयी ही ओढ आहे. आणि हे सर्व करत असताना ते ग्रामीण जीवन जवळून पाहतात व लेखन करतात. त्यातून त्यांना यश मिळत जाते. त्यांनी बऱ्याच शाळातून विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने भाषणे दिली आहेत. विटा येथे गणपती उत्सवात 'जीवननिष्ठा' या विषयावर त्यांनी दिलेले व्याख्यान गौरवपूर्ण ठरले. सांगली येथील 'महात्मा गांधी वसतिगृहाच्या' स्नेह संमेलन प्रसंगी त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे विद्यार्थ्यांना जिव्हाळ्याने केलेला एक उपदेशच होता.

या साऱ्यातून प्रवास करत भोसले यांचे वाङ्मय सर्वसामान्य समाजापर्यंत पोहचत होते.

१९३४-३५ च्या सुमारास 'किर्लोस्कर' या मासिकाचा त्यांना परिचय झाला. आणि त्यातून येणाऱ्या फडके, खांडेकरांच्या गोष्टींनी त्यांना विचार करायला लावले. त्यांची वाचनाची आवड वाढत गेली आणि त्यामुळे लेखनाचे तंत्र त्यांना सापडले व सुरुवातीच्या कादंबरी लेखनास त्यांना प्रवृत्त केले.

सर्वत्र उपेक्षेचे वातावरण भेडसावत असताना ते लिहित राहिले आपल्या लेखनाबद्दल ते म्हणतात, ''जे जीवन मी जगत होतो, जे चोवीस तास डोळ्यांनी पाहत होतो. त्या जीवनाबद्दल माझ्या

मनात जिव्हाळा होता. जीवनात मला दु:खाचे आणि सुखाचे अनेक क्षण बघावयास मिळाले ते हृदयावर कोरुनच मला लिहिण्याची स्फूर्ती मिळे. मला अभिमान वाटतो. माझ्या लेखनातील सगळ्या कल्पना मला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभूतीतून मिळाल्या आहेत.''[४]

भोसले यांचे व्यक्तिमत्व जीवनाच्या अनुभूतीतून या स्वरूपात घडत गेले आहे. पूर्वपरिचय नसताना त्यांच्या 'खिल्लारी जोडी' या कथेचे मर्म जाणणारे शंकरभाऊ किर्लोस्कर, 'मुकामार' कथेचे हस्तलिखित वाचून अभिनंदनाचे पत्र पाठविणारे रघुवीर सावंत, 'समरांगण' कादंबरीला प्रस्तावना लिहिणारे मामा वरेरकर त्यांच्या वाङ्मयाला आपल्या व्याख्यानातून वाचा फोडणारे गोपीनाथ तळवळकर, 'गार सावली' या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहिणारे श्री. के.क्षीरसागर, त्यांचा वाङ्मयीन परिचय लिहिणारे वि. स. खांडेकर, त्यांच्या वाङ्मयीन कृतीबद्दल बक्षिस देणारे ग्वाल्हेर सरकार आणि त्यांनी लिहिलेल्या ग्रामीण वाङ्मयाबद्दल त्यांची पाठ थोपटणारी 'नवयुग', 'मौज', 'विविधवृत्त', 'धर्नुधारी', 'केसरी', 'लोकशक्ती', 'ज्ञानप्रकाश' ही नियतकालिके या साऱ्यातून त्याना उत्तेजन तर मिळत गेलेच पण त्यांचे विविधांगी व्यक्तिमत्व घडत गेले.

## ✳ वाङ्मयीन प्रेरणा :-

म. भा. भोसले यांचे वाङ्मयीन कर्तृत्व फार मोठे आहे. त्यांच्या मनात वाचनाची आवड निर्माण झाल्यानंतर परिचित 'किर्लोस्कर' मासिकातून पंडित महादेवशास्त्री दिवेकर यांचे सुरूवातीस पुष्कळ लेख त्यांनी वाचले. तेव्हा त्यांच्या मनात प्रचंड खळबळ निर्माण झाली. त्याचवेळी भोसले यांच्या जवळच्या खेड्यात एका भोंदू बुवाने थैमान घातले. अज्ञानी लोक त्याच्या विचाराला बळी पडू लागले. तेव्हा त्या लोकांना त्यापासून दूर करावे यासाठी त्यांना कथा लेखनाची कल्पना सुचली आणि लगेच त्यांनी 'राजयोगी' नावाची कादंबरी लिहायला घेतली. व काही दिवसातच ती पूर्ण करून त्या भोंदूबुवाच्या नादी लागणाऱ्या जवळच्या लोकांना ती वाचून दाखविली. तेव्हा त्या कादंबरीतील बुवाला लोक शिव्या देवू लागले. लेखकाचे लेखन यशस्वी झाले त्याचा भोसले यांना अभिमान वाटला व लेखनाविषयी उत्साह वाटू लागला.

ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांच्या विचारांचा प्रभाव भोसले यांच्यावर फार मोठ्या प्रमाणात पडला. त्यांच्या कथा, कादंबऱ्या त्यांनी आवडीने वाचल्या.

म. भा. भोसले यांच्या लेखनावर खांडेकरांच्या विचारांचा जास्त प्रभाव पडलेला दिसतो. त्यांची खांडेकरांच्यावर निष्ठा होती. आपली सुरुवातीची 'समरांगण', 'उघड्या जगात' 'गार सावली' ही पुस्तके त्यांनी खांडेकरांच्याकडे पाठविली होती. खांडेकरांच्या प्रयत्नानेच 'मंगल पिक्चर्स' चे वामनराव कुलकर्णी यांनी त्यांच्या 'उघड्या जगात' या कादंबरीची चित्रपटासाठी निवड केली आणि 'जिवाचा सखा' हा चित्रपट तयार केला. पुढे १९४९ मध्ये 'मनोहर' मधून वि. स. खांडेकरानी भोसले यांचा परिचय करून देणारा 'पडद्यावर चमकणारा प्राथमिक शिक्षक' या रूपात लेख प्रकाशित केला. तेव्हा भोसले यांच्या वाङ्‌मयीन कलाकृतीला एक विशिष्ट रूप प्राप्त झाले. ते दमदार ग्रामीण लेखक आहेत याची साक्ष त्यांनी पटविली आणि भोसले यांच्या व्यक्तिमत्वात खांडेकरांच्या विषयी आदर निर्माण झाला.

''भोसले यांच्या लेखणीचे बळ त्यांच्या वास्तव दृष्टिकोनांत आहे.''[५] या खांडेकरांच्या वाक्याने भोसले यांच्या लेखनाला एक दिशा मिळालेली दिसते.

१९४८ मध्ये पुण्याच्या 'ट्रेनिंग स्कूल' मध्ये भोसले यांच्या 'गार सावली' चे प्रकाशन व त्यावेळी ग्रामीण लेखक ग. ल. ठोकळ यांनी केलेले भाषण, सरोजिनी बाबर यांनी आपल्या साहित्यिक बंधूस दिलेला संदेश, प्राचार्य पानवलकर यांनी भोसले यांचे केलेले कौतुक या साऱ्या गोष्टी भोसले यांना प्रेरणादायी ठरल्या.

'समरांगण' या भोसले यांच्या पहिल्या कादंबरीला मिळालेल्या प्रचंड यशामुळे आपल्या लेखनाची योग्य जाणीव भोसले यांना झालेली दिसते. व त्या उर्मीतच त्यांनी 'उघड्या जगात', 'अहेव लेणं' इ. पुस्तके प्रकाशित केली.

भोसले यांच्या 'समरांगण' कादंबरीला मामा वरेरकर यांनी 'जिनीचा आवाज' ही प्रस्तावना लिहिली आहे. त्यातून त्यांनी खेड्यातल्या जीवनावरचे परिणाम प्रत्यक्ष पाहूनच ही कादंबरी लिहिली गेली आहे. असे म्हटले आहे. त्यांनी या कादंबरीला महत्त्वाचे स्थान दिले आहे त्यामुळे भोसले

यांच्या कौतुकात भर पडलेली दिसते, आणि लेखनाविषयी एक उर्मी त्यांच्या मनात निर्माण झालेली दिसते. आपल्या लेखनाचे खरे तंत्र काय आहे हे स्पष्ट करताना ते म्हणतात, ''माझ्या लेखनातील सगळ्या कल्पना मला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभूतीतून मिळाल्या आहेत, आणि त्या तशा मिळाल्या, म्हणूनच कुठलीही अनुकूल परिस्थिती नसताना मी लिहू लागलो.''[६]

अशा प्रकारे भोसले यांच्या वाङ्मयाच्या कक्षा रूंदावल्या. त्यांचे व्यक्तिमत्व विविध अंगानी बहरले. त्यामुळे समाजातील बहुजनापासून ते शहरी वास्तवापर्यंतचे वर्णन त्यांनी आपल्या वाङ्मयातून केलेले दिसते. त्यामुळे ग्रामीण वाङ्मयात त्यांचे स्थान श्रेष्ठ आहे.

**✳ निष्कर्ष :-**

१. म. भा. भोसले यांचा जन्म ग्रामीण भागात एका खेड्यात अशिक्षित कुटुंबात झाला. व परिस्थितीच्या चक्रात सापडल्याने त्यातून त्यांनी शिक्षण घेतले व ते शिक्षक झाले.

२. 'आजोबाची डायरी' ही भोसले यांची पहिली कथा १९३२ साली 'निर्भीड' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वात याला महत्त्वाचे स्थान आहे.

३. ग्रामीण जीवनातील अनुभव अत्यंत कसदारपणे चित्रित करणे, ग्रामीण जीवनातील कल्पनांचा वापर करून कृषिकेंद्रीत वास्तवतेला प्राधान्य देणे हे भोसले यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे मोठे यश आहे.

४. म. भा. भोसले यांचे व्यक्तिमत्व सर्वगुण संपन्न असल्याने व त्यांच्या साहित्य निर्मितीस योग्य ते वातावरण लाभल्याने त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले.

५. म. भा. भोसले यांच्या व्यक्तिमत्वाला पूरक असे वातावरण घरातच मिळाले त्याचा जबरदस्त परिणाम त्यांच्या मनावर झाला व त्यांना असणाऱ्या वाचनाच्या आवडीने व्यक्तिमत्व घडत गेले.

६. साहित्य लेखनाच्या प्रान्तात भोसले यांना खांडेकरांच्या सारखे प्रेरणादायी लेखक लाभल्याने त्यांच्या विचाराला जास्त चालना मिळत गेली व ते घडत गेले.

७. म. भा. भोसले यांच्या 'समरांगण' या कादंबरीला लाभलेली मामा वरेरकरांची प्रस्तावना त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व घडून येण्यास प्रेरणादायी ठरली. त्या जोरावरच त्यांच्या पुढील वाङ्मयीन कलाकृतींना यश मिळत गेले.

## तळटीपा

१. भोसले म. भा.- 'नांदाय जाते' -'मी जे पाहिलं', पृष्ठ १२६.

२. कुलकर्णी के. ना. -'दै. प्रकाश'-४ फेब्रु. १९५१, परीक्षण

३. भोसले म. भा . - 'कथा जन्माची कथा' -प्रस्तावना, पृष्ठ १५

४. भोसले म. भा. -'नांदाय जाते' - 'मी जे पाहिलं , पृष्ठ १२७

५. खांडेकर वि. स. -'मनोहर'- १९४९

६. भोसले म. भा. -'कथा जन्माची कथा' - प्रस्तावना, पृष्ठ १६

****